# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

---

**दिनांक २३.०८.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २२.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये २९ केसेसमध्ये ३० ईसमावर कारवाई करून एकुण ६,५७,५२२/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये १४ इसमांवर कारवाई करुन ३४,९२०/—रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३२० वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,५५,१५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २२.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २३.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **०५** इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २३.०८.२०२६ चे ०७.०० वा. ते ०९.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मृगयास्वामी व्यायामशाळे समोर, घासबजार, लोहा मार्केट येथे एका काळया रंगाचे ॲक्टिवा मोपेडवरील दोन इसम संशयास्पदरित्या दिसल्याने त्यांना ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नावे १) शेख इजाज शेख मेहमुद वय ३५ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५९, श्मशान घाटजवळ, शांतीनगर, नागपूर २) जीवन कांताराम बारापात्रे वय ३७ वर्ष रा. वडेचे घरी किरायाने, झेंडा चौक, प्रेमनगर, नागपूर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्यातील तरतुदींचे पालन करुन, पंचासमक्ष त्यांची व मोपेडची झडती घेतली असता, आरोपींचे ताब्यात झिपलॉक पन्नीमध्ये एकुण ५२ ग्राम एमडी पावडर मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०३ मोबाईल फोन व ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ बिएक्स. २८७५ असा एकुण ६,४१,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी नमुद एमडी पावडर ही त्यांचे साथीदार पाहीजे आरोपी नामे १) दर्शन चरडे वय अंदाजे ३० वर्षे, रा. गणेश पार्क जवळ, पिवळी नदी, नागपूर २) कुणाल गभणे वय २० वर्ष रा. झेंडा चौक, प्रेमनगर, नागपूर यांचे मदतीने आणल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे लकडगंज येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना

अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, सपोनि. आनंद बिचेवार, पोउपनि. नागेश पुन्नावाड, पोहवा विवेक अढाऊ, शेख इम्रान, ज्ञानेश्वर भोगे, गणेश जोगेकर, मपोहवा. अनुप यादव, पोअं. संतोष शेंद्रे, नितीन राठोड, नितीन साळुंके यांनी केली.



**<u>३) अंबाझरी पोलीसांची कामगिरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक. ०२ गुन्हे उघडकीस.</u>**

पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, एनएमसी इंग्लिश मिडीयम स्कुल, रामनगर जवळ, फिर्यादी यांचे मदर डेअरी नावाचे दुकान आहे. दिनांक २०.०८.२०२६ चे २२.३० वा. ते २१.०८.२०२६ चे ०७.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी हे त्यांचे दुकान बंद करुन घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, दुकानातील रोख १५,०००/—रू. तसेच, दुध दही, मिल्कशेक व आईसक्रिमचे पाकिटे असा एकुण किंमती २५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी जितेंद्र लल्लु चौबे वय ६२ वर्ष रा. प्लॉट क्र. १०/१२, गृहलक्ष्मी सोसायटी, सेमिनरी हिल, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान अंबाझरी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून आरोपींना निष्पन्न केले व यातील आरोपी हे गोकुलपेठ मार्केट येथे शौचालयाजवळ बसलेले आहेत अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, सापळा रचून तीन इसमांना ते पळून जाण्याचे तयारीत असतांना ताब्यात घेतले. पंचासमक्ष नाव पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांची नावे १) विशाल उर्फ बब्बु शालिकराम चचाणे वय २९ वर्षे रा. तेलंगखेडी, रामनगर, नागपुर २) पियुष उर्फ पेढा विनोद बघेल वय २० वर्षे रा. तेलंगखेडी, रामनगर, नागपुर ३) अंकुश उर्फ मिठ्ठु अरुण मरसकोल्हे वय २५ वर्षे रा. राजीव खदान, महादेव मंदीरजवळ, अंबाझरी, नागपुर यांना ताब्यात घेतले. त्यांना गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांची व त्यांचेजवळील वाहनाची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन एकूण रोख १२,२६४/— रु., एक मोबाईल व गुन्हयात वापरलेली ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ३१ ईडी ८०२३ तसेच एक काळया रंगाची ड्रिम युगा गाडी क्र. एमएच ३१ एफडी ८२७१ असा एकूण १,२७,२६४/— रु. चा मुद्येमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपींनी ड्रिम युगा वाहन पोलीस ठाणे अंबाझरी हद्यीतुन चोरी केल्याची कबुली दिली. आरोंपीकडून दोन गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री विनोद गोडबोल, पोउपनि नंदकिशोर पदकोंडे, पोहवा. कमलेश ननीर, पोअं. अमित तिवारी, सैयद हबीब, मनिष रामटेके यांनी केली.

**४) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— वाहन चोरीचे ०३ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १८.०८.२०२६ चे २३.३० वा. ते १९.०८.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, राधाकृष्ण मंदीरामागे एकात्मता नगर, गोसावी चे घरी किरायाने राहणारे फिर्यादी अजय रतनलाल मातरे वय २८ वर्ष यांनी त्यांची लाल रंगाची होंडा १२५ एचपी वाहन क्र. एमपी २२ झेडएच ५१६७ कि. ६०,०००/— रु. ची राहते घरासमोर लॉक व पार्क करुन ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान एमआयडीसी पोलीसांचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, एका सोळा वर्षीय अल्पवयीन मुलास त्याचे पालकासमक्ष ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. अधिक विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हयाव्यतिरिक्त पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतुन हिरो होंडा स्प्लेंडर क्र. एमएच ३१ बीजे ८१७८ कि. ५०,०००/— रु. ची तसेच पोलीस ठाणे वाडी हद्दीतुन हिरो होंडा सीबी शाईन क्र. एमएच ३१ एफके ६६१६ क. ५०,०००/— रु. ची असे एकूण ०३ वाहन चोरी केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त वालकाचे ताब्यातुन तिन्ही वाहने एकूण किमती १,६०,०००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री गोकुल महाजन, पोउपनि पंकज सयाम, पोहवा. प्रमोद गिरी, विक्रांत देशमुख, प्रविण फलके, प्रमोद सोनोने, पोअं अंकुश कनोजिया यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे तहसील :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २२.०८.२०२६ चे २२.१५ वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, भगवाघर चौक, सार्वजनिक रोडवर एक पिवळया रंगाचा शर्ट घातलेला इसम हातात शस्त्र घेऊन जोरजोराने आरडाओरडा करुन धमकी देतांना दिसून आला. नमुद इसम हा आक्रमक असल्याने, त्यासघेराव टाकून ताब्यात घेतले व निशस्त्र केले. त्यास पोलीस ठाणे येथे आणून, पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव मोहम्मद अरबाज उर्फ सानु अन्सारी वल्द मोहम्मइ इसराईल अन्सारी वय २९ वर्षे, रा. कमलबाबा दर्गाहजवळ, मोमीनपुरा, नागपुर असे सांगीतले. त्याचे ताब्यातुन लोखंडी कोयता किंमती ५००/— रु. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोउपनि. मनिष शाहाकार यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. संजय सिंग यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कळमणा:— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २२.०८.२०२६ चे २२.१५ वा. ते दिनांक २३.०८.२०२६ चे ०२.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत नेताजी नगर, प्लॉट क्र. १६०, साईमंदीर मागे, भरतवाडा रोड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी महेंद्र कमलाकर चुग वय ३८ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह चित्रपट पाहण्याकरीता व्हीआर मॉल येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, घरातील रोख १,५०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,००,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. निलेश घोगरे यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे वाडी :—** दिनांक २२.०८.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाडी हद्दीत कंट्रीवाईड लॉजिस्टीक गोडावून, वडधामना, वाडी येथे हल्ली मुक्कामी राहणारे इसम नामे विजय चैतराम टेकाम वय ३५ वर्ष रा. गाव मोया, ता. बिचवा जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश हे मशिनने फ्लोरींगचे काम करीत असतांना, मशिनमध्ये अचानक ईलेक्ट्रीक करंट आल्याने, त्यांना विजेचा धक्का लागल्याने ते खाली पडुन बेशुध्द झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि उत्तम जायभाये यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय–दंडाधिकारी, नागपुर. | ३०१९७१/२०१० | कलम ३२४, ५०४ भा.दं.वि. | रमेश यादवराव नेरलकर रा. टेलिफोन नगर, दिघोरी दहनघाट, संत एकनाथ प्राथमिक शाळा, राखुंडे यांचे घरी, नंदनवन नागपुर | २७.०८.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**